R. N. I. FOR INDIA New Delhi
R. No. – MAHMAR-36829-2010

ISSN – 2229-4929
UGC Approved and
Peer Reviewed Journal

# AKSHAR WANGMAY

**Year : 12 Volume : 2**
**October-November-December 2021**

Editor-in-Chief
**Dr. Nanasaheb Suryawanshi**

Executive Editor
**Dr. Shivajirao Deshmukh**

Advisor
**Dr. Arun Prabhune**

Editorial Board

**Dr. Balasaheb Labde** | **Dr. Deepak Chiddarwar**
**Dr. Ratnakar Bedge** | **Dr. Sandeep Sangle**
Coordinator | Coordinator
**Mr. Ramesh Deshpande (USA)** | **Sonali Jambhekar (USA)**

Publisher : Sou. Rekhatai Nanasaheb Suryawanshi, Pratik Prakashan, 'Pranav', Rukme Nagar, Thodga Road, Ahmedpur 413515

Printer : Printself, 1543, 'Omkar Corner' Navi Peth, Pune 411 030

**Address for sending articles and fees :** Dr. Nanasaheb Suryawanshi
'Pranav', Rukme Nagar, Thodga Road, Ahmedpur 413515
District : Latur
Mobile phone : 9423655841
E-mail : suryawanshinanasaheb67@gmail.com

**Subscription Rates Yearly :** Rs. 500/-  **Five Years :** Rs. 2000/-
**Two years :** Rs. 900/-  **Current Volume :** Rs. 125/-

* Maharashtra State Literary and Cultural Board has granted funds for the Publication of this Journal. But Maharashtra State Literary and Cultural Board has not been responsible for writers opinion in this Journal.

* The content and opinions expressed in the articles are the views of the authors and do not necessarily reflect the views and opinions of the periodical's Editorial Board, publisher or the advisor. The authors are solely responsible for the facts and accuracy of the content of the articles.

## अनुक्रम

- संपादकीय ---------- ५
- मुखपृष्ठाविषयी ---------- ७
- 'संगीत जयद्रथ विडंबन'- एक आकलन ---------- ३३
  **प्रा. चिन्मय मधू घैसास**
- भारतीय साहित्य संशोधनाच्या नव्या दिशा ---------- ४१
  **डॉ. संजय कोळी**
- मराठी-कन्नड साहित्य संबंध ---------- ४६
  **डॉ. चंद्रकांत वाघमारे**
- आदिवासी साहित्य, संस्कृती आणि कला ---------- ५१
  **डॉ. एस. डी. लांडे**
- कवी काळसेकर ---------- ५५
  **प्रा. इंद्रजित भालेराव**
- लेखकाचे घर- नरहर कुरुंदकर ---------- ६६
  **डॉ. ऊर्मिला चाकूरकर**
- आठवणीतले बाबा ---------- ७५
  **तेजस्विनी देव**
- 'आठवणी' नरहर कुरुंदकर ---------- ९२
  **डॉ. बाळकृष्ण कवठेकर**
- जावे त्यांच्या वंशा ---------- १०३
  **सावित्री जगदाळे**
- 'आस्तिक' : मिथककथा आणि गांधीवादी विचारांचे प्रतिबिंब ---------- १११
  **डॉ. दिनेश वाघुंबरे**

- संकल्पाची सिद्धी : 'वादळवाटा' — १२३
  **डॉ. विद्यासागर पाटंगणकर**
- मराठी साहित्यातील समाजवास्तवाचे आशयाशी असणारे अनुबंध – १२७
  **डॉ. नानासाहेब पवार**
- 'पुढल्या हाका' : एक मानसशास्त्रीय दृष्टिकोन — १३६
  **डॉ. प्रकाश शेवाळे**
- 'स्त्री जाणीवा आणि स्त्री संवेदना' : एक अभ्यास- नवा आश्वासक समीक्षा ग्रंथ — १४१
  **प्रा. अरुण ठोके**
- कविता — १४५
  **विलास वैद्य, सुनीता धारवाडकर, डी. बी. जगत्पुरिया**
- 'अक्षर वाङ्मय' चे नूतन व नूतनीकरण केलेले वर्गणीदार — १५०
- संपादक मंडळ — १५२



**'अक्षर वाङ्मय' ची वर्गणी मनीऑर्डर / धनादेश /धनाकर्ष संपादक 'अक्षर वाङ्मय' या नावे किंवा मेल ट्रान्सफरने वर्गणी जमा करावयाची असल्यास भारतीय स्टेट बँक शाखा, अहमदपूर, जि. लातूर येथे जमा करावी.**

**खाते:** संपादक 'अक्षर वाङ्मय' खाते क्र. ३६८३२८४६७५६

**IFSC बँक क्र. SBIN - 0020041 या बँकेतील**

**अक्षर वाङ्मय खाते क्र. ३६८३२८४६७५६**

**वार्षिक वर्गणी रु. ५००/-**

**द्विवार्षिक वर्गणी रु. ९००/-**

**पंचवार्षिक वर्गणी रु. २०००/-**

**गुगल पे नं.- ९४२३६५५८४१**

# मराठी साहित्यातील समाजवास्तवाचे आशयाशी असणारे अनुबंध

– डॉ. नानासाहेब पवार

मराठी साहित्याचा विचार करता नव्वदोत्तरकाळ हा जागतिकीकरणाचा कालखंड आहे. अर्थव्यवस्थेत झालेल्या मूलगामी बदलांमुळे जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत परिवर्तन घडून आलेले आहे. झालेले हे बदल फक्त जगाच्या भौतिक पातळीवरचे नाहीत तर मानवी नातेसंबंध, त्यांचे भावनिकत्व, भाषा, समाजातील मूल्यव्यवस्था इतक्या खोलवर हे बदल झालेले आहेत. हा काळ बाजारकेंद्री आहे. त्यामुळे माणसाचे ग्राहकात रूपांतर झालेले आहे. त्यांच्या माणूसपणापेक्षा त्याचे ग्राहकत्व महत्त्वाचे मानले जात आहे.जागतिकीकरणाच्या सांस्कृतिक आक्रमणाने पूर्वापार चालत आलेले आपले संचित नष्ट केले जात आहे. अमेरिकेचा साम्राज्यवाद, बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वर्चस्व, वाढते संगणकीकरण आणि संपर्क माध्यमांचे अतिक्रमण, माहिती-तंत्रज्ञानाचा विस्फोट, धर्मांध ध्रुवीकरण, दहशतवाद, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, वाढती आर्थिक विषमता आणि बेरोजगारी, लोकचळवळीचा होणारा ऱ्हास, इंग्रजीचा जागतिक भाषा म्हणून झालेला उदय व जगभरातील नष्ट होत असलेल्या बोलीभाषा, पर्यावरणाचा विनाश या साऱ्यांमुळे नव्वदोत्तर कालखंड काळवंडून गेल्याचे दिसते.

तसे लक्षात घेतले तर मराठी साहित्याचा इतिहास सुमारे दीडशे वर्षांचा आहे. या प्रदीर्घ कालावधीत मराठी साहित्यप्रकारांमध्ये अनेक प्रवाह निर्माण झाले. आशय आणि रूपबंधदृष्ट्या मराठी कादंबरीत अनेक प्रयोगही झाले. गेल्या दीडशे वर्षांच्या काळात भारताच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनात फार स्थित्यंतरे झाली. या स्थित्यंतरांचा परिणाम जसा भारतीय समाजजीवनावर झाला, तसा कला, साहित्य आणि अभिरुचीवरही झाला. या स्थित्यंतरांमुळे एक नवे विचारविश्व भारतात निर्माण झाले, त्याचाही परिणाम साहित्यकृतींवर झाला. कादंबरी हा वाङ्मय प्रकारही त्या परिणामांपासून अलिप्त राहिला नाही.

या ठिकाणी प्रारंभी एक मुद्दा विशद केला पाहिजे की ललित साहित्यकृतींचे समाजजीवनाशी जैविक नाते असले तरी साहित्यकृती म्हणजे समाजजीवनाचा रुक्ष लेखाजोखा अथवा केवळ घटना मांडणारा इतिहास नव्हे. ''ललित लेखन हा सामाजिक-राजकीय प्रक्रियांचा अहवाल नसतो उघडच आहे. पण त्याचबरोबर ती समाजापासून दूर अधांतर पोकळीत केलेली निर्मितीसुद्धा नसते हेही स्पष्टच आहे. साहित्यकृतीला प्रथम वाङ्मयीन निकषच लावले पाहिजेत याबद्दल दुमत नाही; पण त्याचप्रमाणे साहित्यकृती एकदा सामाजिक जीवनाचे अंग बनल्यावर तिची सामाजिक-राजकीय समीक्षाही झालीच पाहिजे. कारण साहित्य ही केवळ सामाजिक निष्पत्तीच नसते, तर एक सामाजिक शक्तीही असते, ते सामाजिक कारणांचे फलित जसे असते तसेच ते सामाजिक परिणाम घडवून आणणारे कारणही असते . समाजावर त्याचे इष्टानिष्ट परिणाम होणे अटळ असते. या सर्व कारणांमुळे साहित्याची सामाजिक - राजकीय मीमांसा आवश्यक होऊन बसते.''[१] या भूमिकेतूनच कादंबरी साहित्य या वाङ्मयप्रकाराचीही सामाजिक-राजकीय मीमांसा करावीच लागते. खरे तर हा प्रकार समाजजीवनाशी नाळसंबंध ठेवणारा वाङ्मयप्रकार आहे. ''कादंबरीत आपल्या सभोवतालच्या जगाचा अर्थ लावण्याचे काम चाललेले असते. आपल्या सभोवतालच्या जगात कोणताही अनुभव एकेरी नसतो. त्याकडे पाहण्याचा दृष्टिकोनही एकच असतो, असे नाही, स्थळकाळाने बद्ध असलेल्या वास्तवाचा विस्तृतपणा व्यक्त करणे हे आपले काम आहे असे आजच्या कादंबरीकारांनी ठरवलेले दिसते.''[२] प्रारंभापासूनच प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे समाजाशी नाते ठेवणाऱ्या या वाङ्मयप्रकाराने जागतिकीकरणाच्या गतिमान प्रक्रियेत समाजवास्तवाचा सृजनशील अनुवाद करतानाच त्याचे अन्वयार्थ देखील विशद करण्याचा प्रयत्न केला आहे.

### ग्रामीण जीवनावरील परिणाम

जागतिकीकरण हा विषय संपूर्ण जगाला व्यापून राहिलेला आहे. कोणतेही क्षेत्र यापासून दूर नाही. उदारीकरण भारतात येऊन आता जवळपास पंचवीस-तीस वर्ष उलटून गेली आहेत. या काळात जगात अनेक बदल झाले. त्यामुळे त्याचे भारतीय समाजावर सकारात्मक व नकारात्मक असे दोन्ही स्वरूपाचे परिणाम दिसू लागले. उदारीकरणामुळे देशी-परदेशी खाजगी भांडवल देशात



मोठ्या प्रमाणावर वाढत गेले. या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर नफा असणाऱ्या क्षेत्रांना महत्त्व आले. यामध्ये उद्योग, प्रसारमाध्यमे, इंटरनेट, माहिती-तंत्रज्ञान सेवा व मनोरंजन या क्षेत्राची भरमसाठ वाढ झाली आहे. ग्रामीण जीवनावर आशादायक आणि निराशादायक असे संमिश्र परिणाम झाले आहेत.

जागतिकीकरणानंतर ग्रामीण भागात बेकारी वाढली. रोजगाराच्या संधी कमी झाल्या. जगणे अवघड झाले. शेतीला पर्यायी उद्योगांची जोड हवी होती पण भांडवलाभावी मिळू शकली नाही. त्यामुळे पारंपरिक व्यवसाय करणाऱ्याचे व्यवसाय हिरावून घेतले गेले. जागतिकीकरणाने समता प्रस्थापित होईल असे तत्त्व सांगितले होते. त्याचा विपरीत परिणाम होऊन सर्व क्षेत्रात विषमता मोठ्या प्रमाणावर निर्माण झाली व त्यामुळे आर्थिक समता उलट्या दिशेने प्रस्थापित झाली. शेतीतील हे मनुष्यबळ रोजगाराच्या शोधात शहराकडे आले. खेडी ओस पडली व शहरांना सूज येऊन तिथल्या समस्या तीव्र झाल्या. शेती आणि शेतीसंबंधित क्षेत्रात प्रचंड रोजगार उपलब्ध होऊ शकतो हे माहीत असून सुद्धा शेतीची हेळसांड करण्यात आली. शेतीवर अवलंबून असणारे शेतकरी, शेतमजूर, आलुतेदार-बलुतेदार सारे उखडले गेले. या साऱ्यांना विस्थापित झाल्याच्या भावनेने घेरले आहे.

### कादंबरी आणि ग्रामीण जीवन

१९९० नंतरच्या जागतिकीकरणाच्या गतिमान प्रक्रियेचा परिणाम दलित आणि ग्रामीण कादंबरीचा आशय, निवेदन आणि भाषा या तीनही घटकांवर झालेला आहे. १९९० नंतरच्या समाजवास्तवाचे आशयाशी असणारे अनुबंध काही उदाहरणांवरून शोधण्याचा येथे प्रयत्न केला आहे. सदानंद देशमुख यांच्या 'बारोमास ' या कादंबरीत जागतिकीकरणाचे परिणाम ग्रामीण जीवनावर कसे आणि किती खोलवर झाले आहेत याचे गंभीर चित्रण केले आहे. ''शिकूनही दारिद्र्य आणि बेकारी यामुळे अगतिक झालेल्या तरुण पिढीची दिशाहीनता. शहरीकरणाच्या संपर्कामुळे निर्माण झालेला वाढता चंगळवाद, जागतिकीकरणाचे शेतीवर झालेला दुष्परिणाम, बेभरवशाच्या शेतीमुळे सतत भेडसावणारी उद्याची चिंता आणि कर्जबाजारीपणा यामुळे गांजलेल्या शेतकऱ्यांना करावा लागत असलेल्या आत्महत्या, सरकारी उदासीनता, त्यातही शिरलेले संधिसाधू राजकारण

आणि भ्रष्टाचार असे किती तरी विषय आपल्या आशय कक्षेत सामावून घेणारी ही कादंबरी म्हणजे आजच्या विषमता पोसणाऱ्या अर्थव्यवस्थेचा आणि समाजव्यवस्थेचा जाहीर पंचनामाच आहे.''[३] सदानंद देशमुख यांनी 'बारोमास' या कादंबरीत जागतिकीकरणाच्या गतिमान प्रक्रियेमुळे बदलणाऱ्या ग्रामीण वास्तवाचे विश्लेषण केले आहे, अन्वयार्थ शोधले आहेत .

एका बाजूने सारे जग एखाद्या खेड्यासारखे जवळ आले असताना भारतातील खेड्यापाड्यात राहणारी माणसे मात्र अजूनही जातीधर्मांच्या अभेद्य भिंतीमध्ये कायम कैद झालेली आहेत. राजन गवस यांची 'तणकट' ही कादंबरी ग्रामीण जीवनात जातीजातींमधले संघर्षाचे वास्तव सूक्ष्मपणे टिपते... ''राजन गवस यांनी आजवरच्या दलित ग्रामीण कादंबरीत केन्द्रस्थानी असलेले प्रश्न 'तणकट'च्या परिघावर नेऊन ठेवले आहेत... 'तणकट'मध्ये रुढ ग्रामीण व दलित समस्या एकेका प्रसंगाच्या रूपाने किंवा केवळ उल्लेखातून नोंदल्या जातात. मारहाण, पाणवठा, आंबेडकर जयंती हे मुख्य प्रश्न नाहीत तर रोजचे जीवन जगताना भाकरीचा, ती स्वाभिमानाने, कष्ट करून मिळवण्याचा प्रश्न महत्त्वाचा आहे हे भान येथे साकारले जाते... कृषी संस्कृतीच्या संदर्भात माणसामाणसांतील संबंध समंजसपणे टिकवले पाहिजेत व प्रश्नांची नवी मांडणी केली पाहिजे हे भान लेखकाने फार ताकदीने दिले आहे.''[४] राजन गवस यांच्या 'तणकट' कादंबरीने ग्रामीण व दलित जीवनावरील कादंबऱ्यांमधील सीमारेषा पुसून टाकल्या. समाजात परिवर्तन घडवून आणणाऱ्या चळवळींना आलेली स्थितीशीलता, अपयशी असलेल्याही चळवळींना केवळ जातींच्या आधारावर आंधळेपणाने दिलेला पाठिंबा, चळवळी आणि समाज दोहोंनाही आलेल्या ओंगळवाण्या रूपामुळे त्या दोहोंपासूनही दूर पळणारा, संयमी, विचारशील पण कृतिशून्य युवावर्ग, जगण्याच्या मुख्य प्रश्नांना बगल देऊन केवळ संघर्षाच्या राजकारणाला आणि समाजकारणाला कंटाळलेल्या पण अशा स्थितीत काय करावे हे न कळलेला सामान्य माणूस 'तणकट' मध्ये आहे . ही कादंबरी ग्रामीण जीवनाचा समकाल चित्रित करणारी आहे. १९८१ मध्ये प्रकाशित झालेल्या नामदेव ढसाळ यांच्या 'हाडकी हाडवळा' या कादंबरीनेही दलित ग्रामीण अशा सीमारेषा पुसून टाकल्या होत्या . राजन गवस यांच्या 'ब- बळीचा' या कादंबरीतही बदललेल्या अर्थकारणाच्या आणि राजकारणाच्या पार्श्वभूमीवर कृषिसंस्कृतीची होणारी दयनीय



स्थिती आणि कोंडी होवून कोलमडणारा शेतकरी, ढासळणारा गावगाडा यांचे चित्रण केले गेले आहे. कृष्णात खोत यांनी 'झड-झिंबड' या कादंबरीत बदलत्या पर्यावरणाने मानवी जीवनावर ओढावलेल्या संकटांचे सूचन केले आहे. आठवडाभर कोसळणाऱ्या- बेसुमार पावसाने कोकणातल्या एका लहान खेड्यात जीवघेणे थैमान माजवले, त्याचे हृद्यस्पर्शी चित्रण 'झड-झिंबड' मध्ये येते. कृषी संस्कृतीचे बदलते रूपस्वरूप अशोक कौतिक कोळी यांच्या 'कुंधा' या कादंबरीतही वेगळा आशय, वेगळे जीवनसंदर्भ घेऊन प्रकट झाले आहे. खानदेशी तावडी भाषेला वाङ्मयीन प्रतिष्ठा आणि ती बोलणाऱ्या समूहाच्या जगण्याला साहित्याची आशय वस्तू होण्याची संधी देण्याचा प्रयत्न अशोक कोळी समर्थपणे करताना दिसतात. या कादंबरीत 'कुंधा' हे एक प्रतीक आहे. कुंध्याचे प्रतीक थोडे उकलून सांगायचे तर असे म्हणता येईल की, या कादंबरीत वतनदारवाडा हे कष्टाने कसल्या जाणाऱ्या शेतीचे प्रतिनिधीत्व करतो. जसे कुंधा नावाचे तणकट शेतीचा नाश करते, तसे समकालीन राजकारण- समाजकारण- अर्थकारणाचे मूल्यहीन तणकट गावगाड्याचा- शेतीचा नाश करते असा प्रत्ययकारी आशय या कादंबरीचा आहे. आनंद विंगकर यांच्या 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' या कादंबरीत भारतीय कृषिअर्थव्यवस्था कोलमडल्यामुळे शेतकऱ्यांचे शेतीवर आणि संपूर्ण गावगाड्यावर कोसळलेल्या न संपणाऱ्या अनिष्टाची जीवघेणी धग आहे. रवीन्द्र शोभणे यांच्या 'पांढर' या कादंबरीत दुष्काळाचे चित्रण करीत समकालीन सामाजिक पर्यावरणाची अन्वर्थक चिकित्सा केली आहे. '' 'पांढर' कादंबरी जितकी खरसोलीच्या गावाची आहे, तितकीच ती एकविसाव्या शतकातील भारतीय अर्थव्यवस्था, प्रशासन आणि राजकीय इच्छाशक्तीतील अंतर्विरोधांची देखील आहे.''[५] या कादंबरीत एका गावातील दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर एकूणच या देशातील कृषीव्यवस्थेवर आलेल्या अरिष्टांची आणि समाजकारण, राजकारणाच्या मूल्यहीनतेचीही चर्चा केली आहे. महेन्द्र कदम यांच्या 'आगळ' या कादंबरीत १९९० नंतरच्या बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणात ग्रामजीवनातील हरवत चाललेल्या नात्यांचा अन्वर्थक शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

भारत काळे यांच्या 'ऐसे कुणबी भूपाळ' मध्ये बदलत्या सामाजिक सांस्कृतिक पर्यावरणामुळे गावगाड्यातील संयुक्त कुटुंब व्यवस्था कशी कोलमडत चालली आहे, त्याचे चित्रण आहे. पखालीने पाणी भरणाऱ्या कोळी समाजाचा

पारंपरिक व्यवसाय आधुनिकीकरणाच्या प्रगतीच्या वरवंट्याखाली रगडल्या गेल्यानंतरचे वास्तव, पिढ्यांमधील संघर्ष बाबाराव मुसळे यांनी 'पखाल ' या कादंबरीतून अन्वर्थकपणे कथन केला आहे, तर 'वारूळ' या कादंबरीतून त्यांनी स्वातंत्र्योत्तर काळातील मातंग समाजाच्या स्थित्यंतरांचा चिकित्सक वेध घेतला आहे. शंकर सखाराम यांनी 'एस ई झेड' या कादंबरीतून 'एस ई झेड' च्या नावाखाली शेतकऱ्यांच्या जमिनी हडपण्याचे तंत्र, त्याविरुद्धचे रायगड जिल्ह्यातील जनआंदोलन आदींचे चित्रण करून औद्योगिकरणाच्या ऑक्टोपसचे रौद्रभीषण रूप दाखविले आहे.

राजन खान यांची 'सत ना गत' ही वेगळ्या विषयावरची लक्षणीय कादंबरी आहे. पतीच्या संमतीने उदरनिर्वाहासाठी दोन माणसांशी आठवड्यातून प्रत्येकी एक दिवस शरीरसंबंध ठेवणाऱ्या नामी नावाच्या एका स्त्रीवर पोलीस कोठडीत असोले नावाचा फौजदार बलात्कार करतो. पहाटे तिला घरी आणूनही सोडतो. ती तक्रारही करत नाही, पण ह्या बलात्काराची बातमी एका स्थानिक वृत्तपत्रात येते आणि 'नामी'च्या आयुष्याची फरफट सुरू होते. समकालीन समाजाच्या अधःपतनाचे अलक्षित असे पण सुन्न करून टाकणारे रूप 'सत ना गत' मध्ये अभिव्यक्त झाले आहे.

**कथा आणि ग्रामीण जीवन**

एखाद्या विशिष्ट काळातील साहित्याचे स्वरूप समजून घ्यायचे असेल तर त्या काळातील समाज वास्तवही समजून घ्यावे लागेल. माणूस आणि त्याचा समाज यांना वेगळे करून कोणत्याही साहित्याचा विचार करता येत नाही. ग्रामीण कथा याला अपवाद असण्याचे कोणतेही कारण नाही. नव्वदोत्तर ग्रामीण कथेचा विचार करताना येथील ग्रामीण वास्तवाचे आणि त्यात घडून आलेल्या स्थित्यंतराचाही विचार करावा लागतो. शहरी जीवनापेक्षा ग्रामीण जीवन हे संथ असल्याचे दिसत असले तरी जागतिकीकरणाच्या काळात या ग्रामीण जीवनात लक्षणीय स्वरूपाचे बदल घडून आले. जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली आणि आपल्या जगण्यात झालेले फरक दिसू लागले. बाजारकेंद्रित समाजातल्या बहुतांश घटकांचे झालेले वस्तुकरण, अगदी माणसालाही त्याच्या संवेदना समजून न घेता त्याला बाजाराचा एक घटक म्हणून जोखण्याची रूढ झालेली पद्धत,



ज्याचा आवाज मोठा तो दखलपात्र आणि ज्याचा आवाज क्षीण तो अदखलपात्र अशी झालेली विभागणी या काळात पाहायला मिळते. अशाच प्रकारचे मत आसाराम लोमटे व्यक्त करताना लिहितात, ''आजचे वास्तव स्थितिशील नाही ते निर्विकारपणे पहावे इतके थंडही नाही. या वास्तवाचा चेहरा निर्दयी, भेसूर आणि भक्ष्याला गिळंकृत करण्यासाठी वासलेल्या कराल जबड्याप्रमाणे आहे. यात भक्ष्यस्थानी कोण? तर जबड्यात घेण्याआधी एखाद्या श्वापदाने पायाखाली किंवा पंजाखाली घेताना त्यांचा आवाजही उमटणार नाही असे सगळेच. मी ज्या वास्तवाच्या तुकड्यावर उभा आहे ते वास्तव संभ्रमित करणारे आहे. वरकरणी ते लोभस, हिंदकळणारे, मायावी आणि फेसाळल्याप्रमाणे वाटत असले तरीही त्याच्या बुडाशी असलेला गाळ अस्वस्थ करणारा आहे. जी प्रचंड गती या जगण्याला लाभली आहे ती उतारावरून सुसाट पळणाऱ्या एखाद्या दगडी शेळी प्रमाणे आहे. ही गती आणि भोवती चिरफाळ्या करून टाकणारे वास्तव.''[६] सामाजिक विषमता संपली नव्हती पण या विषमतेविरुद्ध आवाज उठवणाऱ्या चळवळी अस्तंगत झाल्या होत्या. अल्पभूधारक, कोरडवाहू शेतकरी देशोधडीला लागलेला असताना शेतकऱ्यांमधून मोठा उठाव होण्याची कोणतीच शक्यता दिसत नव्हती. ऐंशीच्या दशकात लाखोंची गर्दी जमा करणारी शेतकरी चळवळ १९९० नंतरच्या काळात प्रभावहीन झाली. खेडी पोटभर जगू देत नाहीत आणि केलेल्या कामाचे मोलही मिळत नाही, म्हणून स्थलांतर वाढले. महानगरांच्या भोवती अशा स्थलांतरितांच्या वस्त्याच आकाराला आल्या. गावकुसाबाहेर राहणाऱ्या दलित समाजाने सामाजिक विषमतेतून मुक्त होऊन आधीच गावे सोडली होती. पुढे भूमिहीन, अल्पभूधारक शेतकऱ्यांचाही यात समावेश झाला.

आसाराम लोमटे यांनी आपल्या कथासाहित्यातून सातत्याने मराठवाड्यातील बदलत्या ग्रामीण जीवनाचा वेध घेतला आहे. 'आलोक' या कथासंग्रहातील 'वळण' या कथेतील वारंवार पडणारे दुष्काळ व या दुष्काळी परिस्थितीतही गरीब कुटुंबातील मुलगी शिक्षणासाठी धडपडते आहे, याचे चित्रण या कथेतून येते. या कथेतील प्रयाग ही मुलगी शिक्षणासाठी धडपडते आहे. आज ग्रामीण जीवनात जी उदासीनता दिसून येते, त्याचा परिणाम म्हणून मुलं-मुली शिक्षणाकडे झपाट्याने वळले आहेत. त्यांना शिक्षणाशिवाय दुसरा कुठलाही पर्याय दिसत नाही. त्यातूनच ती त्याच्यासाठी धडपडत आहेत. आजचे शेतीचे वास्तव हे

त्यांना लक्षात आल्यामुळे ती या व्यवस्थेकडे या दृष्टीने पाहते.

**समारोप**

१९९० नंतरच्या दलित आणि ग्रामीण कथा व कादंबऱ्यांनी बदलत्या समाजवास्तवाचा अन्वर्थकतेने वेध घेतला आहे. सामाजिक वास्तवाचे कलापूर्ण विश्लेषण करीत असताना काही कादंबऱ्या दलित आणि ग्रामीण अशा साहित्यप्रवाहाच्या सीमारेषा पुसून टाकणाऱ्या ठरल्या. आशयद्रव्य ग्रामीण वास्तवाच्या पार्श्वभूमीवर घडत असतानाही काही कादंबऱ्या साहित्यप्रवाहांच्या वर्गीकरणाच्या चौकटीही मोडून टाकतात. 'राघववेळ', 'तणकट', 'निशाणी डावा अंगठा' या कादंबऱ्या म्हणजे वरील दोन प्रकारांची उदाहरणे होत. जागतिकीकरणातील स्थित्यंतरे पचवून दलित आणि ग्रामीण कादंबऱ्यांनी माणूस आणि समाज सांस्कृतिक पर्यावरणाचे कलात्मक विश्लेषण करताना अनेकदा दलित आणि ग्रामीण जीवनजाणिवांचे साहचर्य दिसते, अनेकदा या दोन्ही जाणिवा परस्पर समांतर असल्याचेही दिसते, अनेकदा परस्परांना त्या छेदूनही जातात असे असले तरी वैचारिक, सांस्कृतिकदृष्ट्या या जाणिवांचे परस्पर भिन्नत्वही नजरेत भरल्याशिवाय राहत नाही. एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळातील दलित आणि ग्रामीण कादंबऱ्यांनी सभोवतीचे सामाजिक सांस्कृतिक पर्यावरण कवेत घेत असतानाच समूहाच्या जगण्यातील अनेक नवे विषय शब्दबद्ध केले आहेत, काही अलक्षित पण महत्त्वाचे विषयही या कादंबऱ्यांनी मुखर केले आहेत. दलितांचे आणि ग्रामीण माणसांचे जगणे अजूनही सुखावह झालेले नाही. या माणसांच्या डोळ्यांतले अश्रू अजूनही कायम आहेत. कारण दलितांचे आणि ग्रामीण माणसांचे जग बदलविण्याचे प्रश्न सध्या सृजनशील कादंबरीकारांनी ऐरणीवर घेतले आहेत.

तसेच जागतिकीकरणातील स्थित्यंतरे पचवून त्याचा अन्वयार्थ लावण्याचे काम ग्रामीण कथेने केले आहे. त्यामुळे ग्रामीण कथा ही आशय, विषय, रूपबंध यात बदलत चाललेली दिसून येते. ही कथा नेमकेपणाने समाजाला, त्यातील वास्तवाला भिडणारी, सर्वांगीण जीवनाचा वेध घेण्याची क्षमता असणारी कथा सदानंद देशमुख, आसाराम लोमटे, अशोक कोळी, किरण गुरव या कथाकारांनी आपल्या लेखनातून व्यक्त केली आहे.



**संदर्भ टीपा :**

१. भोले भा.ल. 'साहित्यप्रत्यय' स्वरूप प्रकाशन औरंगाबाद , २००१, पृष्ठ ३३.
२. डहाके वसंत आबाजी 'मराठीतील कथनरूपे ' पॉप्युलर प्रकाशन , मुंबई २०१२, पृष्ठ १३३.
३. ठाकूर रवीन्द्र 'मराठी कादंबरी : समाजशास्त्रीय समीक्षा' दिलीपराज प्रकाशन, पुणे २००७ , पृष्ठ ३२५.
४. निगुडकर भारती 'मराठी कादंबरी : आस्वादयात्रा'( संपा. विजया राजाध्यक्ष) पॉप्युलर प्रकाशन, मुंबई २००८, पृष्ठ ४४६.
५. घारे दीपक 'ललित' मासिक, मुंबई, जुलै २०१० पृष्ठ २८.
६. लोमटे आसाराम, समकाल आणि मी, मुक्त शब्द, मे २०१६, वर्ष सातवे, अंक पहिला. पृ.०८.

**डॉ. नानासाहेब पवार, मराठी विभाग**
अण्णासाहेब मगर महाविद्यालय,
हडपसर, पुणे– ४११ ०२८
भ्रमणध्वनी– ७८७५०६९८७

❑❑❑

'अक्षर वाङ्मय' ची वर्गणी मनीऑर्डर / धनादेश /धनाकर्ष संपादक 'अक्षर वाङ्मय' या नावे किंवा मेल ट्रान्सफरने वर्गणी जमा करावयाची असल्यास भारतीय स्टेट बँक शाखा, अहमदपूर, जि. लातूर येथे जमा करावी.

**खाते:** संपादक 'अक्षर वाङ्मय' खाते क्र. ३६८३२८४६७५६
IFSC बँक क्र. SBIN - 0020041 या बँकेतील
अक्षर वाङ्मय खाते क्र. ३६८३२८४६७५६

वार्षिक वर्गणी रु. ५००/–
द्विवार्षिक वर्गणी रु. ९००/–
पंचवार्षिक वर्गणी रु. २०००/–
गुगल पे नं.– ९४२३६५५८४१